## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ ची साक्ष

## निशाणी क्र. १६

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – किशोर विठ्ठल पाटील,

वय – ४५ वर्षे,

व्यवसाय – ऑटो गॅरेज व्यवसायीक,

राहणार – बाम्हणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे,

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे मार्फत.**

१. दि. ०२.०६.२०१८ रोजी मला दोंडाईचा येथील पोलीसांनी बोलाविले नव्हते. त्यादिवशी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नाही. माझी कोठेही सही घेण्यात आली नाही. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) सदर पंचनाम्यावरील अ. क्र. १ कडील सही माझी नाही.

(सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतली. तशी अनुमती देण्यात येते.)

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०२.०६.२०१८ रोजी मला व दुसरा पंच यांना दोंडाईचा येथील पोलीसांनी बस व ॲपेरिक्षा यांच्यामध्ये झालेल्या अपघाताच्या घटनास्थळी पंच म्हणुन बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस गोपाळ अरुण मराठे यांनी घटनास्थळ दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस पोलीसांनी घटनास्थळी दिसत्या वस्तुस्थिती प्रमाणे पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा मी वाचुन पाहिला व तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस वाचविण्याकरीता मी आज रोजी माझी पंचनाम्यावरील सही नाकारुन खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. व्ही. तायडे यांचे मार्फत.</u>

**उलटतपास नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.12.24 11:01:27 +0530

दिनांक : २३/१२/२०२४ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

## प्रमाणपत्र

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - गणेश साईनाथ अहिरे |
| न्यायालयाचे नांव | - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - २४.१२.२०२४. |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)